मुंबई – ४०० ०३२
२९ जानेवारी, २०१६.

विषय :- <u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नियम ४ (१)(ख) मध्ये सूचित केल्यानुसार आपल्या विभागाची माहिती विद्यापीठ च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत</u>

<u>परिपत्रक</u> :-

विद्यापीठातील वित्त व लेखा अधिकारी, सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ ग्रंथालय, प्रभारी परीक्षा नियंत्रक, प्रभारी प्राचार्य सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभाग/कक्ष प्रमुख, यांना विदित करण्यात येते की, सन्माननिय मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या आदेशानुसार आपल्या विभागाशी संबंधित माहिती "माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नियम ४ (१)(ख)" मध्ये अंतर्भूत करण्यात आलेल्या १७ (सतरा) आबंधनांनुसार (प्रत संलग्न) आपल्या विभागाशी निगडित माहिती विद्यापीठाचे संकेतस्थळ www.mu.ac.in वर दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१६ किंवा त्यापूर्वी प्रसिध्द करण्यात यावीत.

तसेच, प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीची प्रत परस्पर श्री श्रीरंग तु. पाटील, सिस्टिम अँण्ड नेटवर्क मॅनेजर, केंद्रिय संगणकीय सुविधा (CCF), विद्यानगरी, कलिना, मुंबई – ४०० ०९८ (Tel. : 022 26543254) यांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात यावी.

सन्माननिय मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे.

कुलसचिव

क्र. इएसटी/आयसीडी/२०१५-१६/२०२४

२९ जानेवारी, २०१६.

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
प्रभारी प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय,
प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ ग्रंथालय,
प्रभारी परीक्षा नियंत्रक, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री,
वित्त व लेखा अधिकारी आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभाग/कक्ष प्रमुख.

कुलसचिव

any other device;

(k) "State Information Commission" means the State InformationCommission constituted under sub-section (1) of section 15;

(l) "State Chief Information Commissioner" and "State Information Commissioner" means the State Chief Information Commissioner and the State Information Commissioner appointed under sub-section (3) of section 15;

(m) "State Public Information Officer" means the State Public Information Officer designated under sub-section (1) and includes a State Assistant Public Information Officer designated as such under sub-section (2) of section 5;

(n) "third party" means a person other than the citizen making a request for information and includes a public authority.

■■■

## Chapter II

## RIGHT TO INFORMATION AND OBLIGATIONS OF PUBLIC AUTHORITIES

### 3. Right to information.

Subject to the provisions of this Act, all citizens shall have the right to information.

### 4. Obligations of public authorities.

(1) Every public authority shall—

(a) maintain all its records duly catalogued and indexed in a manner and the form which facilitates the right to information under this Act and ensure that all records that are appropriate to be computerised are, within a reasonable time and subject to availability of resources, computerised and connected through a network all over the country on different systems so that access to such records is facilitated;

(b) publish within one hundred and twenty days from the enactment of this Act,—

(i) the particulars of its organisation, functions and duties;

(ii) the powers and duties of its officers and employees;

(iii) the procedure followed in the decision making process, including channels of supervision and accountability;

कोणत्याही व्यवस्थेचा तपशील;

(आठ) आपल्या एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण, आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण;

(नऊ) आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका;

(दहा) आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन; तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पद्धती;

(अकरा) सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल;

(बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील;

(तेरा) ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील;

(चौदा) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील;

(पंधरा) माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील;

(सोळा) जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील;

(सतरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती;

प्रसिद्ध करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशने अद्ययावत करील;

(ग) ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचते अशी महत्त्वाची धोरणे आखताना आणि असे निर्णय जाहीर करताना सर्व संबंधित वस्तुस्थिती प्रसिद्ध करील;

(घ) आपल्या प्रशासनिक किंवा न्यायिकवत् निर्णयांबाबतची कारणे बाधित व्यक्तींना कळवील.

(२) माहिती मिळवण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीतकमी आधार घ्यावा लागावा यासाठी, नियमित कालांतराने, लोकांना इंटरनेटसह, संपर्काच्या विविध साधनांद्वारे, स्वतःहून माहिती पुरविण्यासाठी, पोटकलम (१) च्या खंड (ख) च्या आवश्यकतांनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशील राहील.

(३) पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, प्रत्येक माहिती, विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरूपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल.

(४) पुरेपूर मोबदला देणारा खर्च, स्थानिक भाषा आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वात प्रभावी पद्धती या बाबी विचारात घेऊन, सर्व माहिती प्रसारित करण्यात येईल आणि यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शक्यतो इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ती माहिती मोफत किंवा विहित करण्यात येईल अशा माध्यमाच्या खर्चाएवढ्या किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढ्या किंमतीला सहजपणे उपलब्ध असावी.

स्पष्टीकरण.– पोटकलम (३) आणि (४) च्या प्रयोजनार्थ, "प्रसारित" याचा अर्थ, सूचनाफलक, वृत्तपत्रे, जाहीर घोषणा, प्रसारमाध्यमांतून ध्वनिक्षेपण, इंटरनेट यांच्याद्वारे किंवा कोणत्याही अन्य मार्गाने लोकांना